`

बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ११ जूलै २०२५**

# फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४९९/२०२५ भा.न्या.सहिता कलम २८१,१२५(अ)(ब),मोवाकाक १८४,१३४(अ) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०३/०७/२०२५ रोजी ०५.४५ वा. चे सुमारास शिवाजी चौक ते जुना पुना नाका सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/०७/२०२५ रोजी २३.५३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | हौसेदार नामदेव ढंगे,वय-५२ वर्षे,रा- मंगळवेढा जि.सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात रिक्षा चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी, यातील नमुद फिर्यादी व फिर्यादीचा मित्र सत्यवान शिलेदार असे दोघेजण मो.सायकल क्र एमएच १३ डी सी ३११६ वरून मंगळवेढा येथून सोलापूर मार्गे लातूरला मुतखडा आजराचे औषध घेण्याकरीता जात असताना नमुद ठिकाणी फिर्यादी यांच्या जाण्याच्या मार्गावर समोरून रॉगसाईडने एक अज्ञात रिक्षा आली व त्या रिक्षा चालकाने भरधाव वेगात येवून फिर्यादीच्या मो.सायकलीस समोरून जोराची धडक दिली त्यावेळी फिर्यादी व फिर्यादीचा मित्र दोघेजण मो.सायकलसह रस्त्यावर पडले सदर रिक्षा धडक देवून रिक्षा चालक न थांबता वेगात निघून गेला आहे तसेच त्या धडकेत फिर्यादीच्या उजव्या पायास गंभीर दुखापत झाली तसेच फिर्यादीची मो.सायकल चालविणारा फिर्यादीच्या मित्रास उजव्या पायाच्या गुडघ्यास गंभीर दुखापत झाली आहे.तपास:- पोह/१३८५/कसबे-८८३०३८३२३६ |

# फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४९७/२०२५ भा.न्या.सहिता कलम २८१,१२५(ए),३५२,३५१(२),मोवाकाक १८४,१३४,१७७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०७/०९/२०२५ रोजी २२.०० वा चे सुमारास मंगळवार पेठ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १०/०७/२०२५ रोजी २३.४९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | संदिप शशिकांत जाधव,वय-४१ वर्षे,रा- प्लॉट नं ए/४३ वसंत विहार सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात रिक्षा क्र एमएच १३ ई एफ ०६७९ चा चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे त्याच्या ताब्यातील वाहन क्र एमएच १३ ई एम ००१२ या वाहनावरून नमुद ठिकाणी जेवणाचे पार्सल घेण्यासाठी जात असताना फिर्यादी हे अन्नपुर्णा लंच होम समोर रोडवर आलो असता नमुद ॲटो रिक्षा चालकाने समोरून धडक दिल्याने फिर्यादीच्या डाव्या पायाच्या पंज्याला खरचटून मार लागला आहे तसेच पाठीला कंबरेला मुक्का मार लागला आहे तसेच फिर्यादीच्या मो.सायकलचे डाव्या बाजूचे आरसा,स्टॅन,बॉडीचा पत्रा तुटुन नुकसान केले आहे तसेच नमुद रिक्षा चालकाने फिर्यादीस शिवीगाळ करून मारण्यास अंगावरून येवून तेथून निघून गेला आहे.तपास:- पोह/२८५/रूपनर-८७८८२८४४७४ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ३०१/२०२५ भा.न्या.सहिता कलम ११८(१),३२४(४),११५(२),३५२,३५१(२),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि ०८/०७/२०२५ रोजी २१.३० वा चे सुमारास फिर्यादीच्या राहत्या घरासमोर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १०/०७/२०२५ रोजी २०.०० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | विजया सुभाष कोरे,वय-३५ वर्षे,रा-घरनं ४७३ गौतम नगर झोपडपट्टी विजापूर रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) प्रदिप गायगवळी २) नागसेन गायगवळी ३) आदर्श गायगवळी ४) अशिष गायगवळी रा माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी हे कुंटुंबियासोबत घरासमोर थांबले असता लहान मुलाचे झाले भांडणाचे कारणावरून नमुद अरोपी क्र ०१ ते ०४ यांनी फिर्यादीस फिर्यादीच्या पती सुभाष कोरे,भाऊ रविद्र कांबळे व मुलगा बुध्दभूषण यास हाताने लाकडाने तसेच फायटरने मारहाण करून जखमी केले आहे तसेच आमच्या नादाला लागू नका नाहीतर जिवंत सोडणार नाही म्हणून धमकी दिली आहे व शिवीगाळ केली आहे सदर भांडणात फिर्यादीच्या गळयातील ०४ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र पडून गहाळ झाले आहे.तपास:- पोह१३२५/सांगळे-८८८८९०१९९९ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ३०३/२०२५ भादवि ३८० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि १३/०८/२०२२ रोजी ११.०० वा ते १३.०० वा चे सुमारास सुभाष नगर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १०/०७/२०२५ रोजी २३.२३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | शरयू रावसाहेब पाटील,वय-८० वर्षे,रा- घरनं ०३ सुभाष नगर चौगुले वस्ती सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात इसम |
| **गेला माल** | | २ लाख रूपये त्यात ०४ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र,०२ तोळे सोन्याचे बोरमाळ,०२ तोळे वजनाचे सोन्याचे चैन,०२ कानातील फुले २ तोळे वजानाचे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादीचे घराचे उघडया दरवाजातून कोणीतरी अज्ञात चोरटा घरात प्रवेश करून घरात ठेवलेले वरील वर्णनाचे सोन्याचे दागिने हे फिर्यादीचे समंतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.तपास:- पोह/१७२०/भिसे- ९०२१४१०९६१ |